**<u>नियमीत दिवाणी दावा क्र.९५१/२०२४ मधील निशाणी ०७ खालील आदेश</u>**

**आदेश पारीत दिनांक ०६/०२/२०२६**

**उत्तम वि. गणपती**

**(CNR NO.MHLA050008692025)**

**०१.** वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रकिया संहितेचे आदेश ०६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरूस्ती करणे कामी दाखल केलेला आहे.

**०२.** वादीचे अर्जातील कथन असे आहे की, वादी यांनी दावा परिच्छेद क्र.३ मधील तिसऱ्या ओळीमध्ये टंकलेखनाच्या चुकीमुळे "गट क्र.६३/४ च्या अगोदर मौजे रुई येथील जमीन गट क्रमांक" हे टंकलिखीत करण्याचे राहून गेले आहे. तसेच, परिच्छेद क्र.३ मध्ये चौथ्या ओळीमध्ये "२ एकर ४ आर " ऐवजी "८३ आर जमीन", पाचव्या ओळीमध्ये "मौजे वरवंटी" ऐवजी "मौजे शिंदगी" अशी दुरुस्ती करावी. तसेच, त्याच परिच्छेदमधील सहाव्या ओळीमध्ये "जमिन गट क्र.१७/१/२ च्या पुर्वी मौजे वरवंटी येथील जमीन गट क्रमांक" असे नमुद करावे आणि सातव्या ओळीमध्ये ४० आरच्या नंतर "मौजे वरवंटी येथील जमीन गट क्र.१०/२/२ क्षेत्र ५४ आर जमीन" असे नमुद करण्यासाठी सदरचा अर्ज दाखल करुन विनंती केलेली आहे. सदर दुरुस्तीने मुळ दाव्यात कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात यावा, अशी विनंती वादी यांनी केली.

**०३.** प्रतिवादी यांनी अर्जास म्हणणे देवून अर्ज व त्यातील संपुर्ण मजकुर हा खोटा असून तो प्रतिवादीस मान्य नसल्याचे नमूद केले आहे. तसेच, त्यांनी सदरचा खोटा अर्ज देवून सदर प्रकरण विनाकारण प्रलंबित ठेवत असल्याचे नमूद केले आहे. पुढे त्यांनी सदरच्या दावा दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार आहे, त्यामुळे वादीचा अर्ज खर्चासह खारीज करण्यात यावा अशी विनंती केली.

**०४.** दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला. सदरचा दावा हा दिवाणी दावा क्र.६९२/२०२४ मधील दि.१६/०८/२०२४ रोजीचा हुकूमनामा वादीवर बंधनकारक नसल्याचे जाहीर होवून वादीस वाटणी करुन वेगळा ताबा मिळण्याकामी दाखल केलेला आहे. वादी यांना या अर्जाद्वारे वर नमूद दुरुस्त्या करावयाच्या आहेत. सदर दुरुस्तीने प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. दाव्याचा गुणदोषावर निकाल लागण्यास त्याची मदतच होणार आहे. अशा परिस्थितीत वादीचा अर्ज मंजुर होणे आवश्यक आहे.

म्हणुन, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

**१.** वादीचा दुरूस्ती अर्ज मंजुर करण्यात येतो.

**२.** वादीने विहीत मुदतीत दुरूस्ती करुन दुरूस्त दाव्याची प्रत दाखल करावी.

Digitally signed by WABALE RAMDAS DAULAT
Date: 2026.02.06 14:39:11 +0530

**(आर.डी. वाबळे)**

दिनांक: ०६/०२/२०२६

सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर.
अहमदपूर.